# माझा बकुल ! माझा प्राण !

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**माझा बकुल ! माझा प्राण ! : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ ८०/-

# माझा बकुल ! माझा प्राण !

# १

काल तिसऱ्या प्रहरी मोठं वादळ झालं होतं. वळिवाचा मुसळधार पाऊस पडला होता... आज सकाळी मात्र आकाश निरभ्र होतं, हवा अगदी स्वच्छ पडली होती. काल संध्याकाळी झोडपणारी जलवृष्टी केल्याची गोष्ट सकाळच्या या स्वच्छ निळ्या आकाशाच्या गावीच नव्हती. जणू कालचं संध्याकाळचं आकाश हे नव्हतंच! निराळंच आकाश सूर्याच्या कोवळ्या किरणानं भरलेलं निळं निळं चमकणारं. पाहाणाराच्या डोळ्यांना सुख देणारं. मनाला प्रसन्नता आणणारं.

मात्र काल खूप पाऊस झाल्यामुळे उन्हाळी सुट्टी घालविण्यासाठी महाबळेश्वरला आलेले पाहुणे पुण्या-मुंबईकडे आज जाऊ लागले होते. सीझन संपला होता.

पुण्या-मुंबईच्या राजरस्त्यावर बसगाड्यांची आणि खाजगी मोटारींची रहदारी आज होती. पण मुंबई-पुण्याहून महाबळेश्वरकडे जाणारी वहानं थोडी होती. महाबळेश्वराहून पुण्या-मुंबईकडे परत जाणाऱ्या गाड्यांचीच संख्या अधिक होती.

अशा एका टूरिंगकारमध्ये कावेरी बसली होती. गाडीत पुढच्या बाजूला बाबू ड्रायव्हर गाडी हाकीत होता. त्याच्या शेजारी गाडीचा मालक गंगाधर वर्तक बसला होता. मागच्या सीटवर कावेरीच्या शेजारी गंगाधरची बायको उषा बसली होती व तिच्या शेजारी गंगाधरची म्हातारी आई राधाकाकू बसल्या होत्या.

राधाकाकू डोळे मिटून पेंगत होत्या. गंगाधर, उषा आणि कावेरी यांच्या गप्पा गोष्टी मधून मधून चालू होत्या. त्यात राधाकाकूंना रस नव्हता.

आठदहा दिवसांपूर्वी उषा वर्तक कावेरीकडे आली होती व म्हणाली होती, 'मी आणि गंगाधर आठ दिवसासाठी महाबळेश्वरला जाणार आहोत गाडी घेऊन. आमच्याबरोबर तू यावंस अशी माझी व गंगाधरची फार इच्छा आहे. यायला आवडेल का तुला?'

कावेरी म्हणाली होती, 'जरूर आवडेल. मी अजून महाबळेश्वर बघितलेलं नाही. पण तुम्हा नवराबायकोंना माझी अडचण नाही का होणार? नुकतंच लग्न झालंय तुमचं. तुमच्या एकांताच्या मजेत माझा कशाला उगाच व्यत्यय?'

उषा हसली होती व म्हणाली होती, 'ते आमचं आम्ही बघू. यायचं कबूल कर पाहू !'

कावेरीनं उषाचं आमंत्रण स्वीकारलं होतं. उषा आणि गंगाधर यांच्याबरोबर ती महाबळेश्वरला गेली होती.

त्यांचा महाबळेश्वरचा मुक्काम खूपच मजेत झाला होता.

आता त्या तिघांच्या गप्पा चालल्या होत्या. त्या महाबळेश्वरच्या मुक्कामात केलेल्या मजेच्या पुन्हा आठवणी काढण्याच्या स्वरूपाच्याच होत्या, केव्हा, कुठे, काय काय मजा आपण केली त्याची उजळणी ती तिघं करीत होती.

पुढच्या सीटवर बसलेला गंगाधर मान वळवून उषा आणि कावेरी यांच्याशी बोलत होता... गप्पांच्या ओघात तो सांगू लागला, 'आमच्या दादांना बरोबर घेण्याची माझी इच्छा होती पण ते आले नाहीत. ते मला म्हणाले, महाबळेश्वरची पूर्वीची मजा आता राहिली नाही. आता जो उठतो तो महाबळेश्वराला जातो. बकाली झालं आहे महाबळेश्वर. ब्रिटिशांच्या राजवटीत म्हणे उन्हाळ्याच्या सीझनमध्ये बहुतेक सरकारी कचेऱ्या महाबळेश्वराला हलत असत. गव्हर्नर साहेबांचा मुक्काम महाबळेश्वरच्या गव्हर्नमेंट हाऊसमध्ये असायचा. आणि त्यामुळे सांगली, मिरज, कुरुंदवाड, जमखिंडी, फलटण अशा मोठ्या छोट्या संस्थानांचे अधिपतीही महाबळेश्वरला तळ ठोकून बसत. सीझन संपत आला की युरोपियन क्लबावर एके रात्री बॉलडान्स व्हायचा. केव्हा तरी 'पोलो' ची मॅच व्हायची. अखेर गव्हर्नमेंट



हाऊसवर एके दिवशी संध्याकाळी मोठी निरोपाची पार्टी व्हायची. या पार्टीचं आमंत्रण येणं म्हणजे मोठा सन्मान समजण्यात येत असे. आमंत्रण यावे म्हणून मोठे मोठे लोक खटपट करीत असत. गव्हर्नरसाहेबांची ही पार्टी झाली की सीझन संपला असं समजण्यात येत असे. आणि सारे संस्थानिक, वरिष्ठ सरकारी अधिकारी, मुंबईचे बडे बडे धनिक महाबळेश्वरहून परत फिरत असत. आता यातलं काही उरलं नाही. वळिवाचे पाऊस झाले की सीझन संपतो आणि महाबळेश्वर खाली होऊ लागतं. आमच्या दादांच्या जमान्यात पूर्वी फक्त शेलकी माणसं महाबळेश्वरला जात असत. या कारणानं महाबळेश्वर शांत असे. आता सारा कलकलाट झाला आहे. पाथ्याशी असलेल्या वेण्णा तलावाचा काठ म्हणजे मुंबईची चौपाटी झाली आहे.–'

उषा एकदम म्हणाली, 'ही सारी म्हातारी माणसं आजच्या जगावर अशी नाराज असतात. त्यांना जुन्या जगाच्या आठवणी येतात. जुन्या जगाच्या तुलनेने आजचं जग त्यांना आवडत नाही. नव्या जगाची मौज घेणारी तरुण पिढी मूर्ख आहे असं त्यांना वाटतं.'

कावेरी म्हणाली, 'म्हाताऱ्या माणसांवरचा तुझा आरोप खोटा नाही. पण आपण जरा विचार केला तर आपल्याला कबूल करावं लागेल की त्यांच्या म्हणण्यातही पुष्कळ तथ्य आहे.'

त्या तिघांच्या अशा गप्पा चालल्या होत्या. गाडी वेगानं धावत होती आणि तिघांच्या गप्पाही रंगत होत्या.

तितक्यात गाडीचा वेग कमी झाला. आणखी आणखी कमी होत गेला आणि अखेर गाडी उभीच राहिली. गाडी थांबवून बाबू ड्रायव्हर खाली उतरला... त्यानं गाडीची पुढची मागची बाजू तपासली आणि गंगाधरजवळ येऊन तो म्हणाला.

'खाली उतरायला पाहिजे सगळ्यांनी.'

गंगाधरानं विचारलं, 'काय रे? पंक्चर?'

ड्रायव्हर म्हणाला, 'नाही.'

'मग काय? पेट्रोल संपलं?'

'नाही.'

'मग काय?'

'पाटा तुटलाय.'

'शाबास ! मग रे?'

'पुण्याला जाऊन नवा पाटा विकत आणायला हवा.'

'मोठीच आफत आली म्हणायची !'

सगळीजणं गाडीतून खाली उतरली.

आता नवा पाटा येऊन गाडी पुन्हा सुरू व्हायला कमीत कमी तीन, चार तास लागणार हे उघड होतं... महाबळेश्वराहून पुण्याकडे जाणारी गाडी थांबवायची, आणि पाटा आणण्यासाठी बाबूला पुण्यास पाठविणं, आणि माणसांचीही रवानगी करणं भाग होतं. गंगाधरच्या म्हाताऱ्या आईला उघड्या रस्त्यावर तीन चार तास काढण्याचे श्रम सोसण्यासारखे नव्हते. रस्त्यात पडलेल्या मोटारीचं आणि तिच्यातील सामानाचं रक्षण करण्यासाठी गंगाधरला या जागेवर राहणं भाग होतं.

त्यांचा हा बेत ठरला न ठरला तोच महाबळेश्वराहून पुण्याकडे जाणारी एक टूरिंगकार येत असलेली दिसली.

गंगाधरानं रस्त्याच्या मधोमध उभं राहून खूण करून थांबविली. आणि गाडीतल्या लोकांना आपल्यावर ओढवलेल्या परिस्थितीची कल्पना देऊन गंगाधरनं विनंती केली की आमची माणसं न्याल तर आभारी होईन. पण त्या गाडीत बाबू, गंगाधरची आई, उषा व कावेरी या सर्वांना जागा होण्यासारखीं नव्हती. फारतर तीन माणसांना जाता येणार होतं. कावेरी उषाला म्हणाली, 'आईला घेऊन तू जा. मी थांबते.'

बाबू ड्रायव्हर गाडीत बसला. गंगाधरच्या आईला घेऊन उषाही बसली. बसण्यापूर्वी तिनं गंगाधरला म्हटलं, 'संभाळून रहा आणि शक्य तितक्या लवकर ये !...' गंगाधरनं सांगितलं, 'माझी काळजी करू नकोस. कदाचित् मला फार उशीर होईल.'

ती गाडी चालू लागली. आता कावेरीची रवानगी करण्यासाठी दुसरी गाडी अशी थांबविणं भाग होतं. पण फार वेळ गेला नाही तो दुसरीही गाडी आली.



त्या गाडीत पुढच्या सीटवर गाडीचे मालक बसले होते. त्यांच्या शेजारी एक स्त्री बसली होती. ती त्यांची बायको असावी. मागच्या बाजूला एक तरुण पुरुष बसलेला दिसला.

कावेरीला जागा देण्यासाठी तो तरुण पुरुष खाली उतरला. पुढच्या सीटवर बसलेली स्त्री दार उघडून खाली उतरली. ती कावेरीला म्हणाली, 'आपण दोघी मागे बसू.' खाली उतरलेला तरुण पुरुष पुढच्या सीटवर बसला. गाडीच्या मालकीणबाई व कावेरी मागच्या सीटवर बसल्या.

कावेरीनं गंगाधरला म्हटलं, 'आता चार तास इथे रस्त्यात एकट्यानं काढावे लागणार आहेत तुम्हाला.'

गंगाधर हसला आणि म्हणाला, 'सुदैवानं सिगरेटची पुष्कळ पाकिटं सूटकेसमध्ये आहेत. बसतो सिगरेटी ओढीत. तुम्ही जा.' गाडीतल्या माणसांकडे बघत तो म्हणाला, 'सुदैवानं उत्तम सोबत मिळाली आहे तुम्हाला' ...त्यानं त्या मंडळींचे आभार मानले.

गाडी चालू झाली. थोड्याच वेळात दिसेनाशी झाली.

ज्या स्त्रीजवळ कावेरी बसली होती ती तिला म्हणाली, 'माझं नाव सीमा. गाडी हाकीत आहेत ते माझे मिस्टर, त्यांचं नाव जयंत धारकर आणि त्यांच्या शेजारी जे बसले आहेत त्यांचं नाव नागेश टिपणीस. ते आमचे मित्र आहेत.'

कावेरी म्हणाली, 'माझं नाव कावेरी भावे–'

गाडी हाकता हाकता जयंतनं मान किंचित वळवून विचारलं, 'सुप्रसिद्ध वकील नानासाहेब भावे तुमचे कोण?'

कावेरीनं उत्तर दिलं, 'ते माझे वडील.'

'होय का? फार छान !'

'कोणत्या कॉलेजात शिकता?'

'यंदाच बी. ए. झाले वाडियामधून.'

'मग आता काय? एम्. ए. चा अभ्यास करणार असाल?'

'होय, पण नोकरीही करते.'

'कुठे?'

'माझ्या एका मैत्रिणीनं नर्सरी स्कूल काढलं आहे त्यात करते काम. मला लहान मुलं फार आवडतात. ह्या कारणानं नर्सरी स्कूलमधलं काम मी पत्करलंय. पगारासाठी नव्हे तर लहान मुलांची संगत-सोबत मिळते म्हणून.'

इतका वेळ स्तब्ध राहिलेला नागेश तोंड न वळविता म्हणाला, 'मग लग्नानंतर मुलं नकोत म्हणणाऱ्यांपैकी तुम्ही नाही म्हणायच्या? आमच्या या सीमाताई बघा, लग्नाला अडीच-तीन वर्षं झाली तरी मूल होऊ दिलं नाही त्यांनी. मुलं हवीत म्हणणाऱ्या तरुण स्त्रिया दुर्मिळ होत चालल्या आहेत !'

चौघेही हसली.

सीमानं कावेरीला म्हटलं, 'किती मुलं हवीत हो तुम्हाला?'

कावेरी म्हणाली, 'चांगली अर्धा डझन हवीत.'

सीमा म्हणाली, 'मग घरच्या घरातच नर्सरी स्कूल काढावं लागेल तुम्हाला !'

मघापेक्षा अधिक मोठ्यांदा सर्वजण हसली.

कावेरीला आढळून आलं की सीमा, जयंत, नागेश या सर्वांनाच बोलण्याची हौस होती. अशी बोलघेवडी माणसं तिला फार आवडत असत. आणि अशा बडबड्या माणसांच्या संगतीत ती रमत असे. गप्पांच्या विषयांना काय तोटा होता?

हिंदी-मराठी चित्रपट, सिनेमाच्या क्षेत्रातील तारे व तारका, मराठी नाटकं, रंगभूमीवर ज्यांचं नाव गाजत होतं असे नट आणि नटी; कुमार गंधर्व, भीमसेन असे गायक; रविशंकर, विलायत खाँ असे सतारवादक; क्रिकेटच्या क्षेत्रात गाजणारे खेळाडू असे एक ना शेकडो विषय होते गप्पांना. ती चौघंजणं एकमेकांची मतं पडताळून बघत होती. क्वचित एकमेकांशी वाद घालीत होती...

मधेच जयंत म्हणाला, 'अहो कावेरीताई, ज्या गोष्टीची तुम्हाला कल्पना नसेल अशी एक गोष्ट सांगतो. आमच्या या मित्राचं नाव नागेश टिपणीस आहे. महाराष्ट्र नाटक मंडळी ज्या मंडळींनी काढली ती मंडळी महाडची. यशवंतराव टिपणीस आणि माधवराव टिपणीस हे दोघे बंधू त्यातले प्रमुख. त्यांच्याशी आमच्या या नागेशचं नातंगोतं लागतं. पण नागेशचे वडील नाटकी टिपणीसांत सामील



झाले नाहीत. ते वकिलीची परीक्षा पास झाले आणि प्रॅक्टिस करण्यासाठी पुण्यात आले. मात्र वकिलीचा धंदा करता करता साऱ्या गद्य व संगीत नाटक मंडळ्यांशी मित्रत्वाचे संबंध ठेवले त्यांनी. आणि विशेष हे की हार्मोनियम वाजविण्याचा भरपूर षोक केला त्यांनी. सुविख्यात हार्मोनियम वादक गोविंदराव टेंबे त्यांच्याशी त्यांचा खूपच स्नेहसंबंध होता. टेंबे म्हणजे एक अजोड हार्मोनियम-वादक होऊन गेले. पण त्यांनी कुणालाही शिकविलं नाही. मात्र त्यांचं वादन ऐकून ऐकून अनेक लोकांनी ती विद्या हस्तगत केली. या नागेशचे वडील त्यांपैकीच. एक चांगले हार्मोनियम वादक म्हणून टिपणीस साहेबांना लोक ओळखीत होते. त्यांनीही नागेशला कधी पुढे बसवून शिकविले नाही. या बाबतीत टेंब्यांचाच कित्ता त्यांनी गिरविला. पण एकलव्याप्रमाणे या नागेशनं बापाची वादन कला हस्तगत केली. बापाचा लहरीपणाही आला आहे याच्यात. वाजवायला बैस म्हटलं तर सहसा ऐकत नाही, पण एखादे वेळेस लहर आली आणि वाजवायला बसला तर असं काही वाजवतो की वा ! आता आमचा परिचय झालाय. हा कधी वाजवायला बसला तर तुम्हाला अवश्य बोलावून घेईन. हार्मोनियम-वादन ऐकायला आवडतं ना तुम्हाला?'

कावेरी म्हणाली, 'वा आवडतं म्हणजे?'

इतका वेळ संभाषणात फारसा भाग न घेणारा नागेश जयंताला म्हणाला, 'झालं तुझं बोलणं? आता मला बोलू दे थोडं कावेरीबाईंशी' त्यानं मान पुरतीच वळविली आणि कावेरीकडे बघत तो म्हणाला, 'या जयंताच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. मी पेटी चांगली वाजवतो, ही केवळ याची कविकल्पना आहे. कुठं गोविंदराव टेंबे, आणि कुठे माझे वडील? आणि त्याच न्यायानं कुठे माझे वडील आणि कुठे मी पेटीवादनाची विद्या मी केवळ सेकंडहँड घेतलेली आहे. मी बरं वाजवतो असं जयंतासारखे चार मित्र मला खूष करण्यासाठी म्हणत असले तर मी हुरळून जाणार नाही. खरं पाहता मी अगदीच मामुली वादन करतो. तुम्ही आवर्जून ऐकावं असं त्यात काही नाही.'

कावेरी म्हणाली, 'ते आमचं आम्ही ठरवू. आमच्यासाठी वाजवायला बसणं तुमचं काम.'